कार्यालय प्रत
Office Copy.

"ज्ञानस्य निर्मलं नेत्रं ज्योतिष्यकमनुत्तमम्"

# ज्योतिर्विद्या परिसंस्था, पुणें

स्थापना १९४४
JYOTIRVIDYA PARISANSTHA POONA2

सन १९७२–७३ वर्ष २९ वे

## वार्षिक वृत्तान्त व समाव्यय

( पुढील वर्षाच्या निकल्पासह )

[ वार्षिक निकाय सभेचें निमंत्रण–मलपृष्ठ २ पाहावें ]


प्रकाशक

स. चिं. मराठे, बी. ई.
प्र. रं. कानडे बी. ई.
कार्यवाह



स. चिं. मराठे
कार्यवाह, ज्योतिर्विद्या परिसंस्था
१९७३ सदाशिव पेठ, पुणें


Book–Post

श्री. रा. रा.

Jyotirvidya Parisanstha Poona
Treasurer

## वार्षिक निकायसभेचे निमंत्रण

चालू ३० व्या वर्षाची निकाय सभा ( जनरल बॉडी मीटिंग ) रविवार दि. १४ ऑक्टोबर १९७३ ला सायंकाळी ५ वाजता महाराष्ट्र राज्य शिक्षणशास्त्र संस्थेच्या ( रा. ब. कुमठेकर पथावरील ) सभागृहात पुणें येथें भरेल. त्यावेळच्या कामकाजाची क्रमणिका खालीं दिली आहे. तरी सर्व सभासदांनीं सभेस अवश्यमेव उपस्थित राहावें ही विनंती.

### क्रमणिका

( १ ) दिवंगत सभासदांविषयीं दुखवटा.
( २ ) १९७२–७३ च्या निकायसभेच्या इतिवृत्तास मान्यता.
( ३ ) पूर्वप्रसिद्ध वृत्तान्ताच्या अनुरोधानें गतवर्षीतील कार्याचें निवेदन.
( ४ ) गतवर्षाच्या समाव्ययास मान्यता.
( ५ ) १९७३–७४ साठीं पदाधिकाऱ्यांची निवड.
( ६ ) १९७३–७४ मध्यें हातीं घ्यावयाचीं कामें.
( ७ ) १९७३–७४ च्या निकल्पावर चर्चा.
( ८ ) आयत्या वेळचे विषय ( अध्यक्षांच्या अनुमतीनें )
( ९ ) प्राध्यक्षांचें भाषण.
(१०) आभार

पुणें. दि. ३१–८–७३

आपले
**स. चिं. मराठे**
**प्र. रं. कानडे**
कार्यवाह

टीप :—सभासदांना कांहीं प्रश्न विचारावयाचे असतील, अगर सूचना करावयाच्या असतील तर त्यांनीं सभेपूर्वी निदान ३ दिवस अगोदर कार्यवाह यांचेकडे तसें लेखी कळवावें.

# ज्योतिर्विद्या परिसंस्था, पुणें.

**ज्ञानस्य निर्मलं नेत्रं ज्योतिष्यकमनुत्तमम् ।**

**स्थापना :—गणेशचतुर्थी शके १८६६ दि. २२–८–१९४४**

## सन १९७२–७३ चा–२९ व्या वर्षाचा–वृत्तान्त

प्रिय सदस्य,

सतत प्रगतिपथावर असणाऱ्या आपल्या संस्थेनें आता ३० व्या वर्षांत पदार्पण केलें आहे. दि. ३० जून १९७३ ला संपणाऱ्या २९ व्या वर्षातील संस्थेच्या कार्याचा हा वार्षिक वृत्तान्त व समाव्यय आपणास सादर करण्यात आम्हास आनंद होत आहे.

### वृत्तान्त वर्षांतील पदाधिकारी—

**प्रशासक मंडळ** [ Governing Council ]

**प्राध्यक्ष :**—प्रा. वि. वि. नारळीकर, एम्. ए. ( कॅन्टब )
लो. टिळक अध्यासनाचे गणिताचे प्राध्यापक ( पुणे विद्यापीठ )

**अध्यक्ष :**—प्रि. गो. रा. परांजपे, एम. एस्सी., एफ्. एन्. आय्., ओ. बी. ई. ( सेवानिवृत्त )

**उपाध्यक्ष :**—प्रा. डॉ. मो. वा. चिपळूणकर, डी. एस्सी.

**नैघिक** :—श्री. य. रा. नेने, एम्. एस्सी.

**कार्यवाह** :—( १ ) श्री. स. चिं. मराठे, बी. ई.
( २ ) श्री. प्र. रं. कानडे, बी. ई.

**सदस्य** :—( १ ) प्रा. स. वि. आपटे, एम्. ए., बी. एस्सी., बी. ई. एस्. ( सेवानिवृत्त )

( २ ) श्री. वि. धों. गोरेशास्त्री
( ३ ) प्रा. ना. म. आठवले, एम्. ए.
( ४ ) प्रा. द. श्री. जोग, एम्. एस्सी.
( ५ ) श्री. मा. भ. पंत, बी. एस्सी., बी. टी.
( ६ ) श्री. स. ग. काजरेकर, बी. एस्सी.
( ७ ) श्री. वि. वि मोडक, जी. डी. सी., जी. सी. सी.
( ८ ) श्री. श्री. शं. पतके, एम्. ए., बी. टी.
( ९ ) प्रा. अ. त्र्यं. ढवळे, एम्. एस्सी.
(१०) प्रा. य. शं. पाटणकर, एम्. एस्सी.
(११) श्री. मो. ना. गोखले, बी. एस्सी.

**अन्तर्गत अधीक्षक** :—श्री. श्री. गो. फणसळकर, बी. ए.

**तद्विद्य मंडळ** ( Academic council ) :—

( १ ) प्रा. वि. वा. नारळीकर
( २ ) प्रि. गो. रा. परांजपे
( ३ ) डॉ. मो. वा. चिपळूणकर
( ४ ) प्रा. स. वि. आपटे
( ५ ) प्रा. ना. म. आठवले
( ६ ) प्रा. द. श्री. जोग
( ७ ) श्री. मा. भ. पंत. ( निमंत्रक )



# वृत्तान्त वर्षांतील कार्याचें इतिवृत्त

## सभा-बैठकी

### प्रशासक मंडळाच्या सभा :—

**१. दि. १३-८-१९७२** रोजी झालेल्या प्रशासक मंडळाच्या सभेंत सन १९७०-७१ आणि १९७१-७२ या दोन वर्षांच्या अहवालाचें खर्डे आणि समाव्यय आणि तपासनिसांकडून आलेलीं प्रमाणपत्रें सभेस सादर केलीं. सभेनें त्यांना मान्यता दिली. त्याचप्रमाणें १९७२-७३ या नवीन वर्षाचा निकल्प सभेपुढें मांडण्यांत आला व सभेनें तो सम्मत केला.

**२. दि. २६-११-१९७२** रोजी झालेल्या प्रशासक मंडळाच्या सभेंत, संस्थेचा दूरादर्श बसविण्यासाठी, प्रतिभामुद्रणालयाचे मालक श्री. लोखंडे आणि श्री. जोशी यांनी देऊ केलेल्या गच्चीच्या योग्ययोग्यातेचा विचार झाला. चर्चेनंतर असें ठरलें कीं प्रतिभा मुद्रणालयाची गच्ची आकाश दर्शनासाठीं उपयोगांत आणावी, परंतु तेथें दूरादर्श बसविण्यासंबंधीं निर्णय एवढ्यांत घेऊं नये.

याच सभेंत १९७२-७३ या वर्षासाठीं तद्विद्यमंडळ निवडलें गेलें.

### वार्षिक निकायसभा

वार्षिक निकायसभा दि १७ सप्टेंबर १९७२ रोजीं भरली होती. या सभेंत नवीन वर्षाचें प्रशासक मंडळ निवडलें गेलें आणि १९७०-७१ व ७१-७२ चें इतिवृत्त आणि समाव्यय मान्य केलें गेलें. तसेंच १९७२-७३ चा निकल्प मान्य केला गेला.

### अभ्यासमंडळाच्या सभा

दर रविवारी संध्याकाळी ४॥ ते ६॥ या वेळात अभ्यास मंडळाची बैठक भरत असे. ज्योतिःशास्त्र अवकाशविज्ञान यांच्याशी संबंधित अशा विविध विषयांवर चर्चा झाल्या. बैठकींनां १० पर्यंत उपस्थिति असे.

## नवसदस्यांचे स्वागत

### आजीव सदस्य.

या वर्षी पुढील व्यक्तींना संस्थेचे सदस्यत्व दिलें.
( १ ) श्री. त्र्यं. बा. तळवळकर, सिरॅमिक इंजिनियर

**सामान्य सदस्य :—**

( १ ) श्री. कुमार सुशील बालमुकुन्द
( २ ) प्रा. वासुदेव भास्कर घाणेकर, एम्. ए., बी. एस्सी, एम्. एड्., डिप्. एड्.
( ३ ) श्री. रघुनाथ नारायण वेलवणकर, बी. ई., ( मेकॅ. इले. )
( ४ ) श्री. हेमंत वासुदेव मोने, बी. एस्सी., ॲग्रि., ( ऑनर्स. )
( ५ ) श्रीमती. उषाताई गोविन्द रानडे, बी. ए., बी. एड्.
( ६ ) श्री. अनिल दत्तात्रेय कुलकर्णी
( ७ ) श्री. संधिप्रकाश जगन्नाथ भिडे
( ८ ) श्री. दत्तात्रेय शान्ताराम मोकाशी, बी. ए.
( ९ ) श्री. एर्रमल्लि शामसुंदर
(१०) श्री. श्रीराम पद्माकर म्हसकर
(११) श्री. मधुसूदन गंगाधर वाडेकर, कॉन्ट्रॅक्टर
(१२) श्री. मधुकर धोंडदेव शान्त, बी. एस्सी.
(१३) श्री. मुजतबा फिरोज हुसेन लोखंडवाला
(१४) श्री विलास विश्वनाथ सोवनी
(१५) श्री. माधव गणेश पळणीटकर
(१६) श्री. सिबॅस्टिअन ल्युकोस मॉरीस
(१७) श्री. राजीव अरुण नाईक
(१८) श्री. सोनोपंत गंगाराम खामकर, कॉन्ट्रॅक्टर
(१९) श्री. गोपिनाथ विठ्ठल इनामदार, एम्. ई.
(२०) श्री. आनंद भालचंद्र फडके, मॉडेलमेकर

**चिरवियोग :—**

परिसंस्थेच्या हितचिंतकांपैकीं डॉ. ना. भि. परुळेकर, संचालक दै. सकाळ, आचार्य, स. ज. भागवत, गारगोटी विद्यापीठ (कोल्हापूर) आणि श्री. द. गो. फडके हे निवर्तल्याचे नमूद करण्यास आम्हास दुःख होते. डॉ. ना. भि. परुळेकर यांचे परिसंस्थेला फार जिव्हाळ्याचे मार्गदर्शन मिळत असे. आचार्य भागवत आणि श्री. द. गो. फडके यांच्या शिक्षण क्षेत्रांतील विविध अनुभवांचा परिसंस्थेला असाच लाभ होत असे. श्री. फडके यांनीं परिसंस्थेच्या कार्यकारी मंडळावर आरंभापासून काम केलेलें होतें.



## संस्थेच्या ग्रंथसंग्रहांत पडलेली भर

१. इंडिअन एफिमेरीज् ॲंड नॉटिकल् अलमॅनॅक् १९७३.
२. हाउ ओल्ड इज अर्थ—पॅट्रिक हर्ले.
३. ॲस्ट्रॉनॉमी—वेकर
४. रेडिओ एक्सप्लोरेशन ऑफ दी प्लॅनेटरी सिस्टिम.—थॉमस डी कार्र.
५. ए बी सी ऑफ ॲस्ट्रॉनॉमी—वीगर्ट
६. मेकिंग फ्रेंडस् विथ दी स्टार्स—ऑर्थर जेड
७. ॲस्ट्रॉनॉमी ॲण्ड कॉस्मॉगॉनी—जीन्स.
८. दी स्टार्स, देअर स्ट्रक्चर ॲण्ड इव्होल्यूशन—टेलर.
९. डिस्कव्हरिंग दी युनिव्हर्स—ए हिस्टरी ऑफ ॲस्ट्रॉनॉमी—कॉलिन रोनन
१०. दी स्टोरी ऑफ ॲस्ट्रॉनॉमी—पॅट्रिक मूर

## संस्थेकडे येणारीं नियतकालिकें

१. सायन्स रिपोर्टर.
२. सायन्स टुडे.
३. स्पॅन.
४. अमेरिकन वार्ताहर.
६. बेल्जिअम वेधशाळेचीं सर्व संशोधनपर प्रकाशनें.
६. सृष्टिज्ञान.
७. एन्डेव्हर ( आय. सी आय. ).
८. अमेरिकन रिव्ह्यू.

## वृत्तांत वर्षांतील संस्थेच्या कार्याचा आढावा

वृत्तांत वर्षांत संस्थेनें आकाशनिदर्शनें, व्याख्यानें लेख इत्यादि प्रकारांनीं आपलें ज्ञानप्रसाराचें काम केलें. ज्योतिःशास्त्रांतील उपयुक्त अशा माहितीचे तक्ते करण्याचें कामही या वर्षी चालू करण्यांत आलें. त्यापैकीं ( १ ) तारकापुंज, ( २ ) सूर्यमाला, ( ३ ) द्वैती तारे इत्यादींचे नमुने तयार झाले आहेत.

दि. १३७–१०–७२ रोजीं साखरवाडी येथें भरलेल्या संयुक्त स्त्रीसंस्थेच्या अधिवेशनांत त्यांच्या निमंत्रणावरून आपल्या संस्थेतर्फे व्याख्यान व आकाशनिदर्शनाचा कार्यक्रम करण्यांत आला. तेथें डॉ. मो. वा. चिपळूणकर यांनीं चंद्र या विषयावर व्याख्यान दिलें. रात्रीं आकाशनिदर्शनाच्या कार्यक्रमांत संस्थेचा दूरादर्श, प्रा. ना. म.

आठवले यांचा रिमट्र् कॅसेग्रेनियन दूरादर्श व पुणें विद्यापीठाचा हेलिओस्टॅट हीं साधनें उपयोगांत आणलीं गेलीं. या कार्यक्रमास स्थानिक शिक्षक व विद्यार्थीही उपस्थित होते.

दि. ९–११–७२ रोजीं श्री. य. बा. रानडे यांच्या गच्चीवरून आकाशनिदर्शनाचा कार्यक्रम करण्यांत आला.

दि. १९, २०, २१ एप्रिल यादिवशीं नूतन मराठी विद्यालयाच्या गच्चीवरून शनीचीं वलयें दाखविण्यांत आलीं. यावेळीं संस्थेच्या दोन्ही दुर्बिणी लावण्यांत आल्या होत्या. या कार्यक्रमास सुमारें ५०० लोक उपस्थित होते.

प्रा. गो. रा. परांजपे यांच्या 'सुविज्ञान आकाशदर्शन' या पुस्तकाचें महाराष्ट्र राज्य साहित्य–संस्कृति मंडळानें प्रकाशन केलें.

त्याचप्रमाणें संस्थेच्या कार्यकारी मंडळाच्या सभासदांनीं व इतर सभासदांनीं ज्योतिःशास्त्राच्या प्रसाराचें व संशोधनाचें काम वैयक्तिक रीत्या केलें. स्थलाभावीं त्या सर्व कार्यांचा उल्लेख येथें करता येणें शक्य नाहीं. मात्र सर्व सभासदांच्या कार्याची नोंद संस्थेच्या दप्तरांत आहे. यावर्षी डॉ. मो. वा. चिपळूणकर, श्री. मो. ना. गोखले, श्री. मा. भ. पंत, श्री. वि. वि मोडक, श्री. सुधाकर भालेराव, श्री. द. रा. कापरेकर, श्री. हे. वा. मोने, पं. हरेकृष्णशास्त्री याज्ञिक, श्री. आनकचंद मय्यावाला, श्री. दिलीप बर्वे, श्री. ग. म. गोखले, श्री. संघिप्रकाश मिडे, श्री. मुजतबा लोखंडवाला या सभासदांनी विशेष कार्य केलें.

* * *

वार्षिक वृत्तांत सम्मत करावा —

सूचक: श्री ग.य.दीक्षित

अनुमोदक: श्री कृ.शांभोबड

गो.रा.परांजपे
२८.१०.१९७३
अध्यक्ष

कार्यवाह



## ज्योतिर्विद्या परिसंस्था, १९७३–७४ चा निकल्प

| आय | रुपये पैसे | व्यय | | रुपये पैसे |
|---|---|---|---|---|
| सामान्य सदस्य वर्गणी | ४५०–०० | कचेरी खर्च, वेतन, विशेष वेतन | | ८००–०० |
| देणग्या | २००–०० | जागा भाडे | | ६००–०० |
| अनुदान, शासकीय | १००–०० | इतर | | |
| ,, महानगरपालिका | ५००–०० | अहवाल मुद्रण | २५०–०० | |
| व्याज | २००–०० | स्टेशनरी | ०५०–०० | |
| आजीव सदस्यत्व शुल्क | ५००–०० | प्रचार मुद्रण | १००–०० | |
| प्रकाशनांची विक्री | २००–०० | टपाल हंशील | १००–०० | |
| | | | ५००–०० | ५०० |
| | | उद्देश, कार्य खर्च | | |
| | | ग्रंथसंग्रह | ३००–०० | |
| | | अभ्यास मंडळ, स्फुट व्याख्याने, चित्रपट खगोल निदर्शने | १५०–०० | |
| अपेक्षित तूट | १८५०–०० | साधन संभार, प्रायोगिक | १५०–०० | |
| (अपेक्षित तूट संस्थेच्या शिलकेतून खर्च करून भरून काढण्यांत येईल.) | | | ६००–०० | ६००–०० |
| | | प्रकाशन | | १५००–०० |
| | ४,०००–०० | | | ४०००–०० |

सूचक:

अनुमोदक

कार्यवाह

## JYOTIRVIDYA PARISANSTHA

Receipts and Payments Account for the year ended 30 th June, 1973.

| RECEIPTS | Rs. Ps. | PAYMENTS | Rs. Ps. |
|---|---|---|---|
| Opening Balance | | Printing | 661–91 |
| Cash in hand | 253–00 | Salary | 600–00 |
| Cash at Bank | 5,575–15 | Liabrary Books | 292–75 |
| Subscription | 330–00 | Study circle | 139–75 |
| Life Members Subscription | 100–00 | Stationery | 85–70 |
| Donation | 27–00 | Furniture & Fixture | 80–25 |
| Interest on Bank A/C | 198–63 | Postage | 39–38 |
| Sale of Books | 68–33 | Misc. Exp. | 19–66 |
| Misc. Receipts | 3–65 | Annual General Meeting Exp. | 17–20 |
| Grant & Donation | 550–00 | Transport | 16–70 |
| | | Maintenance Exp. | 11–00 |
| | | Conveyance | 9–60 |
| | | Office Exp. | 4–95 |
| | | CLOSING BALANCE | |
| | | As on 30–6–1973 | |
| | | Cash in Hand | 84–04 |
| | | Cash at Bank | 5,042–87 |
| | 7,105–76 | | 7,105–76 |

Checked and found correct, Sd/– S. G. Phansalkar, Internal Auditor.



G. D. APTE & Co.
Chartered Accountants
Phone : 57872
United Western Bank Bldg.
Laxmi Road, Poona–2

Schedule IX
vide Rule 17 (1)
Registered No. F–44

5|4|7

Dated : 30th July 1973

Name of the Public Trust : JYOTIRVIDYA PARISANSTHA, POONA

Income and Expenditure Account for the year ending 30th June, 1973.

| EXPENDITURE | | Rs. Ps. | INCOME | | Rs. Ps. |
|---|---|---|---|---|---|
| To Establishment Expenses : | | | By Rent | | — |
| a ) Salary | 600–00 | | By Interest on Bank A/c | | 198–63 |
| b ) Stationery & Printing | 747–61 | | By Donations in cash or kind | | 27–00 |
| c ) Conveyance & Transport | 26–30 | | By Grants : | | 550–00 |
| d ) Postage | 39–38 | | By **Income from other Sources** : | | |
| e ) Office Expenses | 4–95 | | Other Subscriptions | 330–00 | |
| f ) Misc. Expenses | 19–66 | | Miscellaneous | 3–65 | |
| g ) Maintenance Expenses | 11–00 | 1,448–90 | Profit on Sale of Books | 45–56 | |
| | | | Subscriptions | 100–00 | 479–21 |
| To Depreciation | | | | | |
| Library Books | 135–00 | | By Defecit Carried over to Balance Sheet | | 1,269–73 |
| Furniture & Deadstock | 42–00 | | | | |
| Equipment A/c | 114–72 | 291–72 | | | |
| To Amounts Transfered to Reserve or Specific Funds : | | | | | |
| Building & Equipment Fund : | 27–00 | | | | |
| Reserve Fund | 500–00 | | | | |
| Life member Subscription | 100–00 | 627–00 | | | |
| To Expenditure on objects of the Trusts : | | | | | |
| Lectures, Study circle etc. | | 156—95 | | | |
| Total Rs. | | 2,524–57 | Total Rs. | | 2,524–57 |

Dated at Poona : 17–8–1973

Trustees : **Jyotirvidya Parisanstha, Poona**

Sd/– **Y. R. Nane** Treasurer

Sd/–**S. C. Marathe** Secretary

As per our report of even date.

Sd/– **G. D. Apte & Co.**

Chartered Accountants, Auditors.

G. D. APTE & Co. Schedule VII I
Chartered Accountants vide Rule 17 (1) Date : 30th July, 197

Name of the Public Trust : JYOTIRVIDYA PARISANTHA, POON

Balance Sheet as at 30th June, 1973.

| FUNDS & LIABILITIES | | Rs. Ps. | ASSETS | | Rs. Ps. |
|---|---|---|---|---|---|
| Trust Fund of Corpus | | 1,983–25 | Furniture & | | |
| As per last B/sheet. | | | Fixtures | | |
| Other Fund : | | | As per last B/S | 335–70 | |
| (1) Research Fund | | | Additions during | | |
| As per last B/Sheet | 4,500–00 | | the year | 80–50 | |
| Add : Provision during | | | | 415–95 | |
| the year | 500–00 | | Less Depreciation | | |
| | 5,000–00 | | 10% | 42–00 | 373–95 |
| (2) Life Member Subsriptions | | | Library Books | | |
| As per last B/S | 701–00 | | As per last Bl. | 1,057–26 | |
| Additions during | | | Additions during | | |
| the year | 100–00 | | the year | 2,92–75 | |
| | 801–00 | | | 1,350–01 | |
| (3) Building and | | | hers Dep. @10% | 135–00 | |
| Equipment Fund | | | | | 1,215–01 |
| As per B/S | 3,237–00 | | Equipment | | |
| Additions during | | | As per last B/S | 1,147–24 | |
| the year | 27–00 | | Less Depreciation | | |
| | 3,264–00 | | 10% | 114–72 | |
| | | | | | 1,032–52 |
| | | 9,065–00 | stock of publications | | 2242–53 |
| | | | Cash & Bank Balance | | |
| | | | (a) Bank Accounts | | |
| | | | Cosmos Co-op. Urban Bk | | |
| | | | Ltd in S/B A/C | | 5,042–87 |
| | | | (b) With the Secretary | | 84–04 |
| | | | Income and Expenditures A/c. | | |
| | | | Deficit as per I/E A/c | 1,269–73 | |
| | | | Less | | |
| | | | Surplus as per Last B/S | 212/40 | |
| | | | | | 1,057–33 |
| | | 11,048–25 | | | 11,048–25 |

The above Balance Sheet to the best of my/our belief contains a true account of the Funds Liabilities and of the Property and Assets of the Trust.

Dated at Poona 17th Aug. 1973 As per our/my report of even date.

Trustees : Joytirvidya Parisantha, Poona

Sd/– Y. R. Nene S. C. Marathe G. D. Apte & Co.
Treasurer Secretary Chartered Accountants. Auditors

समायवस्थ संस्थात करावा [illegible]



THE BOMBAY PUBLIC TRUST ACT, 1950

Phone : Office : 57872
Residence : 50190

SCHEDULE IX C

G. D. Apte & Co.
Chartered Accountants, ( Vide Rule 32 )
United Western Bank Building,
Laxmi Road, Poona 2.

5/4/7

Date 30th July, 1973

## REPORT OF AN AUDOTOR RELATING TO ACCOUNTS AUDITED UNDER SUB–SECTION (2)

Of Section 33 & 34 and Rule 19 of the Bombay Public Trust Act

Registration No. F–44

Name of the Public Trust

## JYOTIRVIDYA PARISANSTHA, POONA

For the year ending 30th June, 1973

(a) Whether accounts are maiutained regularly and in accordance with the provisions of the Act and the rules: Yes.

(b) Whether receipts and disbursements are properly and correctly shown in the accounts; Yes.

( c ) Whether the cash balance and vouchers in the custody of manager or trustee on the date of audit were in agreement with the accounts; Cash book was not written uptodate.

( d ) Whether all books, deeds, accounts, vouchers or other documents or records required by the auditor were produced to him: Yes.

( e ) Whether a register of movable and immovable properties is properly maintained, the changes therein are communicated from time to time to the regional office, and the defcets and inaccuracies mentioned in the previous audit report have been duly complied with; Yes – not up to date in the prescribed form.

( f ) Whether the manager or trustee or any other person required by the auditor to appear before him did so and furnished the necessary information required by him; Yes.

( g ) Whether any property or funds of the Trust were applied ·for any object or purpose other than the object or purpose of the Trust; No.

( h ) The amounts of outstanding for more than one year and the amounts written off, if any; Nil.

( i ) Whether tenders were invited for repairs or construction involving expenditure exceeding Rs. 500/–; Not applicable.

( j ) Whether any money of the public trust has been invested contrary to the provisions of section 35; No.

( k ) Alienations, if any, of the immovable property contrary to the provisions of section 36 which have come to the notice of the auditor: No.

( l ) All cases of irregular, illegal or improper expenditure, or failure or omission to recover monies or other property belonging to the public trust or of loss or wrste of money or other property there of and whether such expenditure, failure, omission, loss or waste was caused in consequence of breach of trust of misapplication or any other misconduct on the part of the trustees or any other person while in management of the trust: No such instances.

(m) Whether the budget has been filed in the form provided by rule 16 A; Budget not so far filed.

( n ) Whether the maximum and minimum number of the trustees is maintained;

( o ) Whether the meetings are held regularly as provided in such instrument: Two. Mg. Committee Meetings of one General Body Meeting



( p ) Whether the minutes book of the proceeds of the meeting is maintained; Yes

( q ) Whether any of the trustees has any interest in the investment of trust; No.

( r ) Whether any of the trustees is a debtor or creditor of the trust; No.

( s ) Whether the irregulartities pointed out by the auditors in the accounts of the previous year have been duly complied with by the trustees during the period of andit. —

( t ) Any special matter which the auditor may think fit or necessary to bring to the notice of the Deputy or Assistant Charity Commissioner; —

Dated at 17–8–1973

**G. D. Apte & Co.**
Chartered Accountants

THE BOMBAY PUBLIC TRUST ACT, 1950

Schedule IX C

(vide rule 32)

G. D. Apte & Co.
Chartered Accountants
5/4/7

Office ; 57872
Phone Residence : 50190
United Western Bank
Building
Laxmi–Road, Poona–2

Date–30th July 1973.

**Statement of income liable to contribution for the year ending 30th June 1973**

Name of Public Trust

**Jyotirvidya Parisanstha, Poona**

Registration No

| | | |
|---|---|---|
| I. Gross annual income as shown In the income and expenditure acccount (Schedule IX) | | Rs. Ps. 1,254–84 |
| II. Items not chargeable to contribution under section 58 and rule 32 : | The institute is a public trust exclusively for advancement and Propagation of secular education and hence its income is not liable to contribution as per Rule 31(1) (a) of the Bombay Public Trust Rules, 1951. | |
| Deductions on account of repairs in respect of buildings not rented and yielding no income at 10 Per cent of the estimated gross annual rent. | | |
| Gross Annul Income chargeble to–Contribution Rs. | NIL | |

Certified that while claiming deduction admissible under the above Schedule the Trust has not claimed any amount twice either wholly or partly, against any of the items mentioned in the schedule wnich have the effect of double deduction.

Dated : 17–8–73

G. D. Apte & Co.
Chartered Accountants

Trust Address :
Jyotirvidya Parisanstha, Poona

Sd/– Y. R. Nane
Treasruer

Sd/– S. C. Marathe
Secretary



# ज्योतिर्विद्या परिसंस्थेचीं प्रकाशनें

## उपयुक्त व संग्राह्य

( १ ) **सूर्यकुल**—( संग्राहक : प्रा. मो. ल. चंद्रात्रेय व कै. त्र्यं. गो. ढवळे ) सूर्यकुलामधील निरनिराळे ग्रह व उपग्रह, उल्का, लघुग्रह, धूमकेतु इ. संबंधानें ज्ञानसंवर्धक, अद्ययावत् व उपयुक्त माहिती, सुबोध भाषा, विद्वानांनीं एकमुखानें वाखाणलेलें व महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक सभेनें ( डेकन व्हर्नाक्युलर ट्रान्सलेशन सोसायटीनें ) पारितोषिक देऊन गौरविलेलें. पृष्ठसंख्या २८०, किंमत रु. ५. १ ली आवृत्ति संपली. दुसरी आवृत्ती तयार होत आहे.

० ० ० ०

( २ ) **तारकानगरी**—तारकांनीं व्यापिलेल्या एकंदर विश्वाविषयीं उद्बोधक माहिती. तारकादिकांची ओळख, आकाशगंगेचें स्वरूप, दूर अंतरावरच्या ताऱ्यांची माहिती कशी मिळविली जाते, ताऱ्यांच्या गति कशा काढतात, अंतराळांतल्या अनेक विश्वांचें स्वरूप इ. उपयुक्त व मनोरंजक माहिती. याहि प्रकाशनाला डे. व्ह. ट्रान्सलेशन सोसायटीनें पारितोषिक देऊन गौरविलें आहे व विद्वानांनीं प्रशंसिलें आहे. पृष्ठसंख्या १६५, किंमत ४/–रुपये.

० ० ० ०

( ३ ) **ताराचित्रक संच**—( आवृत्ति दुसरी, दोन रंगांत छपाई ) ढळक ढळक ताऱ्यांची ओळख करून देणारे, आकाशाच्या देखाव्यावरून तारीख व वेळ सांगणारे तसेच तारीख वेळेवरून आकाशाचें कोणतें दृश्य दिसूं शकेल त्याचा बोध करणारे दोन मोठे नकाशे. आकार : अनुक्रमें ४०×३० व २७×२२॥ इंच. सोबत खुलासा देणारी विवरण पुस्तिकाहि मिळते. सर्व संचाची किंमत रु. १·५०

० ० ० ०

( ४ ) **वेधसाधनें व वेधशाळा**—प्राचीन काळापासून वेध घेण्याचीं साधनें कोणतीं होतीं, त्यांची वाढ व परिणती पुढें कशी झाली, त्यांची रचना, वेधशाळांचें सामान्य स्वरूप व तेथील कार्य व संवहज्योतिष्यक ( Radio Astronomy ) या विषयांची माहिती या ग्रंथांत सुबोध रीतीनें दिली आहे. किं. रु. २·७५

० ० ० ०

( ५ ) **चंद्रप्रभा**—चंद्राचे वाङ्मयांतील उल्लेख, चंद्रामुळें पंचांग कसें बनतें, चंद्रावर वसाहत करणें कितपत शक्य आहे, चंद्राचीं ग्रहणें, भरती, ओहोटी वगैरे संबंधानें खुलासा व चटकदार वर्णन. डे. व्हर्ना. ट्रान्स्लेशन सोसायटीनें पारितोषिक देऊन गौरविलेलें पुस्तक. पृष्ठसंख्या १३०, किंमत रु. २·५०.

० ० ० ०

( ६ ) **विश्वाची रचना व उत्क्रांति**–(ले. कै. त्र्यं. गो. ढवळे) सबंध विश्वाची घडण क्रमशः कशी होत गेली, अभ्रिका, दीर्घिका, काय आहेत व या विश्वाची उत्क्रांति कशी होत आहे, यासंबंधीं सोपपत्तिक माहिती पृष्ठें ४५, किंमत रु. ०.७५.

० ० ० ०

( ७ ) **संज्ञावली**–ज्योतिष्यकांतील पारिभाषिक शब्दांचे–विवरण पृष्ठें २३. किंमत रु. ०.२५. दुसरी आवृत्ती तयार होत आहे.

० ० ० ०

( ८ ) **छोट्या पुस्तिका व प्रकाशनें; निबंध**—( १ ) **कालमापन व त्यांचीं साधनें** ( ले. कै. त्र्यं. गो. ढवळे ) काल म्हणजे काय, त्याचें मापन इ. खुलासा. ( २ ) **पाश्चात्य ज्योतिष्यकाचा वैचारिक इतिहास**—( ले. कै. त्र्यं. गो. ढवळे ) खिस्तपूर्व दीड हजार वर्षांपासूनच्या पाश्चात्त्य शास्त्रज्ञांच्या कल्पना व बदल यांची माहिती. ( ३ ) **सूर्याचें अंतरंग**—(लेखक : प्रा. दा. गो. ढवळे ) सूर्याच्या अंतरंगासंबंधानें माहिती. ( ४ ) **सूर्यदेवता**—( लेखक : प्रा. मो. ल. चंद्रात्रेय ) सूर्यासंबंधीचे वाङ्मयांतले कांहीं उल्लेख. ( ५ ) **आर्यांच्या मूळ वसतिस्थानासंबंधीं झालेल्या व्याख्यानमालेतील मुद्द्यांचें टांचण.** वरील सर्व छोट्या पुस्तकांची किंमत प्रत्येकी रु. ०.१२—आवृत्ति संपली.

० ० ० ०

**टीप** :—१. प्रकाशनें व्ही. पी. नें पाठविलीं जात नाहींत. २. टपाल हशिलासह पुस्तकांची किंमत मनिऑर्डरनें पाठवावी, ३. सर्व प्रकाशनें शाळाकॉलेजांना व ग्रंथसंग्रहालयांकरितां उपयुक्त आहेत.

**मागणी** :—( १ ) स. चिं. मराठे, कार्यवाह, ज्योतिर्विद्या परिसंस्था १५७१ सदाशिव, पुणें ३० या पत्त्यावर;

अथवा

( २ ) इन्टर नॅशनल बुकसर्व्हिस, पुणें ४ या पत्त्यावर करावीं.

---

प्रकाशक : स. चिं. मराठे, कार्यवाह ज्योतिर्विद्या परिसंस्था, १५७१ सदाशिव, पुणें ३०.

मुद्रक : य. गो. जोशी, आनंद मुद्रणालय, १५२३ सदाशिव, पुणें ३०.